पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

वैद्यकीय मुख्य कार्यालय

# सभावृत्तांत

---

दिनांक – २०/०८/२०२१ वेळ – दु.१२.०० वा.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीकडील विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करणेकामी शुक्रवार, दि.२० ऑगस्ट २०२१ रोजी दु.१२.०० वा. मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्त यांचे दालनात बैठक आयोजित केली होती.

सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री.राजेश पाटील | आयुक्त तथा अध्यक्ष |
| २) श्री.विकास ढाकणे | अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष |
| ३) श्री.अंबर चिंचवडे | अध्यक्ष पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष |
| ४) श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५) श्री.सुभाष इंगळे | उप आयुक्त, प्रशासन |
| ६) श्री चंद्रकांत इंदलकर | उप आयुक्त, कायदा व कामगार कल्याण विभाग |
| ७) डॉ.लक्ष्मण गोफणे | सहा. आरोग्य वैद्य.अधिकारी |
| ८) डॉ शंकर जाधव | वैद्यकिय अधिक्षक वाय.सी.एम.एच. |
| ९) श्री. प्रमोद जगताप | कामगार कल्याण अधिकारी |
| १०) श्री.किशोर शिंगे | उप मुख्य लेखापरीक्षक |
| ११) श्री गोरख भालेकर | प्रमुख संघटक, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ |
| १२) श्री.नवनाथ शिंदे | कार्यकारीणी सदस्य. पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ |

सभेमध्ये खालील मुद्यांवर चर्चा करणेत आली --

| वि क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| १ | धन्वंतरी योजनेमधील सभासदांचा हिस्सा वाढविणेबाबत ... | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेवर होणारा खर्च विचारात घेता प्रत्येक सभासदांकडून घेण्यात येणारी मासिक वर्गणीची रक्कम वाढवून आस्थापनेवरील कर्मचा-यांकडून दरमहा रु.रु.३००/- ऐवजी रु.रु.४००/- तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून दरमहा रु.रु.१५०/- ऐवजी रु.रु.२००/- इतकी वर्गणी घेण्याचा व त्याप्रमाणात मनपाचा दुप्पट हिस्सा धन्वंतरी निधीमध्ये जमा करून घेणेबाबत निर्णय घेणेत आला. तथापि, धन्वंतरी योजना धोरण २०१३ मधील नियम क्र. ४ नुसार सदर अटीमध्ये दुरुस्ती करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो यांचे सूचनेनुसार विभागाने मा. महापालिका सभेची मान्यता घेणेत यावी. |

| | | |
|---|---|---|
| २ | मा. आयुक्त सो यांचे सुचनेनुसार बिलाबाबत निर्णय घेणेकामी उपसमिती स्थापन करणेबाबत. | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेतील बिलाबाबत येणा-या त्रुटी दूर करुन निर्णय घेणेकामी स्वतंत्र उपसमिती वैद्यकिय विभागामार्फत स्थापन करण्यात यावी. सदर समितीमध्ये सभासदांची नियुक्ती करणेबाबत विभागाने मा. आयुक्त सो. यांचेकडे वेगळा प्रस्ताव सादर करावा. |
| ३ | श्री.किरण भगवंत कापसे यांचा मुलगा हा जन्मत: गतिमंद असून त्याला युनिक चिल्ड्रन हॉस्पिटल, चिंचवड येथील डॉ.उमेश कालाने यांचे मार्गदर्शनाखाली उपचार घेत असून कु.ओम कापसे याला कायमस्वरुपी औषधोपचाराची गरज असून त्यांना महिन्याचा औषधांचा खर्च अंदाजे खर्च रु.रु. ३००० ते ५०००/- एवढा असून येणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती करुन मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे निर्णयार्थ | सदर रुग्णास ओपीडी स्वरूपातील दरमहा औषधोपचाराच्या खर्चास २ महिन्यापर्यंत प्रतिपूर्ती करून देण्यात यावी. तसेच सदर २ महिन्याच्या कालावधीत वायसीएम रुग्णालयातील तज्ञांकडून रुग्णाला लागणा-या औषधांबाबत अभिप्राय घेऊन गरजेनुसार सदर औषधांची मागणी वाय.सी.एम. रुग्णालयामार्फत मध्यवर्ती औषध भांडार विभागाकडे करणेत येऊन सदरची औषधे रुग्णास उपलब्ध करुन देणेत यावीत. |
| ४ | श्री.सुनिल तानाजी तांबे यांचा मुलगा कु. प्रद्युम्न तांबे याला Thalassemia Major हा आजार असून त्याचे बोन मॅरो ट्रान्सप्लांन्ट झालेले आहे. त्याला १ वर्षासाठी औषधोपचाराची गरज असून त्याची औषधे खुप महाग आहेत तसेच ती औषधे वैद्यकीय विभागाकडून उपलब्ध करुन देणेत यावी यासाठी श्री.तांबे यांनी विनंती अर्ज केला आहे निर्णयार्थ. | मुद्दा क्र.३ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. |
| ५ | श्री.अक्षय टोके यांचे आईला Blood Cancer या आजारासाठी दर महिन्याला औषधांचा खर्च अंदाजे रु.रु.३०,०००/- ते ३२,०००/- एवढा असून येणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती करुन मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे निर्णयार्थ. | मुद्दा क्र.३ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. |
| ६ | श्री.परशुराम सखाराम पाटील यांचे पत्नीला (Main Pulmonary Artery Thromboembolism) या आजारासाठी गोळया औषधांचा खर्च मिळावा यासाठी विंनती अर्ज केला आहे निर्णयार्थ. (महिना अंदाजे खर्च ३५००/-) | मुद्दा क्र.३ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. शिरसाठ संजय यांना वायसीएम रुग्णालयात ॲडमिट असताना कलरडॉपलर करणेकामी कळविले नुसार त्यांनी बाहेरून सोनोक्लिनिक डायग्नोस्टीक सेंटर येथे तपासणी केली असून, तपासणीचे बील प्रतिपूर्ती करणेकामी विनंती केली आहे. निर्णयार्थ. | याबाबत नव्याने गठीत करण्यात येणा-या उपसमितीमार्फत निर्णय घेणेत यावा. |
| ८ | श्री.नारायण मोहिते यांचा अपघात झाल्याने पायाला इजा झाल्याने आदित्य बिर्ला हॉस्पिटल येथे ओपीडी स्वरूपात उपचार घेतले असून उपचारांचे बील प्रतिपूर्ती करणेकामी विनंती केली आहे. निर्णयार्थ | प्रस्तुत प्रकरणी वाय.सी.एम. रुग्णालयातील अस्थिरोग विभागात श्री. नारायण मोहिते यांचे उपचाराबाबतचे ओपीडी स्वरूपातील कागदपत्रांची तपासणी कामी पाठविणेत येऊन याबाबत अस्थिरोग विभागप्रमुख यांचा अभिप्राय घेणेत यावा. त्यानुसार सदरचा विषय उपसमिती समोर मान्यतेकामी सादर करणेत यावा. |
| ९ | श्री.योगीराज जगताप हे आदित्य बिर्ला हॉस्पिटल मध्ये ॲडमिट असून त्यांचा उपचाराचा खर्च २० लाखापेक्षा जास्त झाला असून अद्यापर्यंत ॲडमिट असून पुढील उपचारासाठी होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत. निर्णयार्थ. | श्री.जगताप यांचे उपचारार्थ र.रु. २[illegible] लाखापेक्षा जास्त येणा-या उपचाराच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. |
| १० | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांना धन्वंतरी योजनेत समाविष्ट करुन त्यांचे कपातीबाबत निर्णयार्थ. | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांना धन्वंतरी योजनेत समाविष्ट करून घेणेबाबत निर्णय घेणेत आला. त्याकामी आस्थापनेवरील कर्मचा-यांकडून र.रु.३००/- ऐवजी र.रु.४००/- तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून र.रु.१५०/- ऐवजी र.रु.२००/- व त्याप्रमाणात मनपाचा दुप्पट हिस्सा निधीमध्ये जमा करून घेणेबाबत निर्णय घेणेत आला. तथापि, धन्वंतरी धोरण २०१३ मधील नियम क्र. २२ (३) नुसार शिक्षण विभागाच्या कर्मचा-यांच्या योजनेमध्ये समावेशनासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात यावी. मा. आयुक्त सो. यांचेशी झालेल्या चर्चेनुसार शिक्षणमंडळातील शिक्षकांना महापालिकेमार्फत ५० टक्के वेतन व शासनामार्फत ५० टक्के वेतन अदा करणेत येते. सद्यस्थितीत शिक्षणमंडळाची प्रतिपूर्तीची बिले ५० टक्के शासन व ५० टक्के महानगरपालिका अदा करते त्यानुसार सदर विषय निर्णय घेणेकामी पुन्हा एकदा धन्वंतरी स्वास्थ्य समितीसमोर ठेवणेकामी मा. आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. याबाबत लेखा विभाग, लेखा परिक्षण व कायदा विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| ११ | प्राथमिक शिक्षण विभागातील श्री.पराग एकनाथ मुंढे, प्रशासन अधिकारी, श्रीम.रजिया खान, पर्यवेक्षक, श्रीम. अनिता जोशी, पर्यवेक्षक तसेच शिपाई कर्मचारी श्री.ढोले, श्री.निगडे, श्री.गायकवाड यांनी धन्वंतरी योजनेत सभासद करुन घेणेबाबत अर्ज केला असून निर्णयार्थ. | मुद्दा क्र.१० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. |
| १२ | मनपाचे रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना बाहेरुन आणलेल्या औषधांचे (High End Drugs) आणि Lab tests/Investigation चे बील Covid-19 च्या Government Notification नुसार अदा करणेबाबत. | कोविड १९ या आजारामुळे मनपाचे रूग्णालयात दाखल झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना बाहेरुन आणलेल्या औषधांचे (High End Drugs) आणि Lab tests/Investigation चे बील Covid-19 च्या Government Notification नुसार अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. |
| १३ | हॉस्पिटलकडून करणेत येणारी सर्जरी व इतर दर निश्चित केले आहेत. याबाबत सोबत जोडलेले यादीतील दरपत्रकास मान्यता मिळणेबाबत. (प्रपत्र अ) | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या दरपत्रकात समाविष्ट नसलेल्या प्रपत्र अ मधील सर्जरी व इतर लॅब टेस्टचे निश्चित केलेल्या दरास मान्यता देण्यात येत आहे. (सोबत प्रपत्र अ जोडलेले आहे.) |
| १४ | मा.अधिष्ठता वाय.सी.एम. रुग्णालय यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सदस्य म्हणून घेण्यात यावे असे दि.०६/०७/२०२१ रोजीच्या मा.अति.आयुक्त(१) यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला | मा.वैद्यकिय अधिक्षक वायसीएम रूग्णालय हे धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे सदस्य असल्या कारणाने मा.अधिष्ठाता वाय.सी.एम. रुग्णालय यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सदस्य म्हणून समाविष्ट करता येणार नाही. |
| १५ | मा. कर्मचारी महासंघ यांच्या मागणीनुसार सेवानिवृत्त होताना कर्मचा-यास त्वरीत धन्वंतरी स्वास्थ योजनेचा लाभ मिळणेबाबत. | सेवानिवृत्तीनंतर सदर कर्मचा-यांना पीपीओ क्रमांक न मिळाल्याने त्यांना धन्वंतरी योजनेचा लाभ देण्यास अडथळा निर्माण होतो तसेच पॅनलवरील रुग्णालयांमार्फत देखील सदर कर्मचा-यांना दाखल करुन घेण्यात येत नसल्याची बाब कर्मचारी महासंघामार्फत उपस्थित करण्यात आली. यास्तव मा.आयुक्त सो. यांनी प्रशासन विभाग व लेखाविभाग यांना त्वरीत याबाबत कार्यवाही करणेबाबत आदेश दिले. लेखा विभागामार्फत मनपा सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना तातडीने पीपीओ क्रमांक उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी . |
| १६ | विभागाने केलेली मागणी | धन्वंतरी विभागाच्या कामकाजाचा व्याप पहाता धन्वंतरी विभागामध्ये २ लिपिक, २ उपलेखापाल कर्मचारी प्रशासन विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात यावेत. त्यामुळे प्रलंबित बिले त्वरीत निकाली काढणे सोयीस्कर होईल. |

धन्वंतरी स्वास्थ योजना बंद करुन विमा योजना कार्यान्वीत करणेकामी मा. महासभेने मान्यता दिलेली असुन सदरचे प्रकरणी न्यायालयामध्ये महासंघामार्फत दावा दाखल करणेत आलेला आहे. त्यानुसार धन्वंतरी स्वास्थ योजनेच्या धोरणामध्ये बदल करण्याबाबत मा. कायदा सल्लागार यांच्याकडुन अभिप्राय घेणेत यावा. अशा सुचना मा. आयुक्त सो. यांनी दिलेल्या आहेत.

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

विषय क्र. २ ते ९ व ११ ते १५ मान्य परंतु विषय क्र. १,१०,११ बाबत सभावृत्तांत विसंगती आहे. या वर निर्णय होणेकामी तातडीने बैठक आयोजित करनेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| नवनाथ शिंदे<br>कार्यकारीणी सदस्य<br>पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ | गोरख भालेकर<br>प्रमुख संघटक.<br>कर्मचारी महासंघ | किशोर शिंगे<br>उपमुख्य लेखापरीक्षक |

विषय क्र. २ ते ९ व ११ ते १५ मान्य परंतु विषय क्र. १,१०,११ बाबत सभावृत्तांत विसंगती आहे. यावर निर्णय होणेकामी कृपया तातडीने बैठक आयोजित करणेस विनंती

| | | |
|---|---|---|
| कामगार कल्याण अधिकारी<br>कामगार कल्याण विभाग | वैद्यकिय अधिक्षक<br>वाय.सी.एम.एच. | अध्यक्ष,<br>पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ |
| सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी<br>वैद्यकीय विभाग | उप आयुक्त,<br>कायदा विभाग | उप आयुक्त,<br>प्रशासन विभाग |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>लेखा विभाग | अतिरिक्त आयुक्त<br>तथा उपाध्यक्ष | आयुक्त<br>तथा अध्यक्ष |